## निवडक



काणकोण : गोवा क्रिकेट असोसिएशनचा सचीवपदी शांबा नाईक देसाई यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना असोसिएशनचे पदाधिकारी.

### गोवा क्रिकेट असोसिएशनच्या सचिवपदी शांबा नाईक देसाई

■ टीम दैनिक हेराल्ड

काणकोण ,दि. १८ : काणकोणचा सेंत्र प्रोमोतोर दि इसतिसाव या जुन्या संस्थेचे अध्यक्ष शांबा नाईक देसाई यांची आज सचीवपदी निवड झाली. माजी सचीव रोहन गावस देसाई यांची अखिल भारतीय क्रिकेट असोसिएशनवर निवड झालावर हे पद रिकत झाले होते.तांचा निवडी बद्दल तांचे येथे अभिनंदन करणयात येत आहे.

---

### साखळी हेडगेवार विद्यामंदिरात नवीन शैक्षणिक वर्ष एप्रिलपासून सुरू करण्यास पाठिंबा

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. १८ : डॉ. के. ब. हेडगेवार विद्यामंदिर, कारापूर तिस्क येथे पालक-शिक्षक संघ (झढ) ची बैठक उत्साहात पार पडली. सदर बैठक घेण्यात आली.या बैठकीत सर्व पालक व कार्यकारिणी सदस्यांनी २०२५ चा शैक्षणिक वर्ष एप्रिल महिन्यापासून सुरू करण्यास संमती दर्शवली. बैठकीपूर्वी इयत्ता ५वी व ८वीच्या पालकांची स्वतंत्र बैठक घेण्यात आली, ज्यामध्ये नवीन शैक्षणिक धोरणामुळे होणाऱ्या बदलांची माहिती देण्यात आली. शिक्षिका प्रज्ञा फडके यांनी इयत्ता ६वी व ९वीसाठीच्या नवीन अभ्यासक्रम व परीक्षापद्धतीविषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर मुख्याध्यापक सदानंद मिशाळ यांनी पालकांशी संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन केले. बैठकीला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बैठकीत उपस्थित सर्व पालकांनी नवीन शैक्षणिक वर्ष एप्रिलपासून सुरू करण्यास एकमताने पाठिंबा दिला. या बैठकीला शाळेचे मुख्याध्यापक सदानंद मिशाळ,पालक शिक्षक संघांच्या अध्यक्षा सौ राधिका कामत सातोस्कर तसेच खजिनदार वामन सावळ उपस्थित होते.बैठकीचे संचालन पालक शिक्षक संघांच्या सचिव शिक्षिका अनुषा शेणय यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवटी शांती मंत्राने बैठकीचा समारोप करण्यात आला.

---

### युगनायकची रविवारी सर्वसाधारण सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १८** : युगनायक गोवा या सामाजीक संघटनेची सर्वसाधारण आमसभा येत्या रविवार दि. २३ रोजी सकाळी १० वाजता आसगांव बार्देश येथे होणार आहे. सदर सभेत वर्ष २०२५-२६ साठी नविन कार्यकारणी निवडण्याहेतू निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. तसेच वर्षभरातील कार्यक्रम व उद्दिष्टे या बद्दल चर्चा करण्यात येईल व शेवटी सभागृहाच्या परवानगीने उर्वरित विषय घेण्यात येतील. युगनायकचे पदाधिकारी , सभासद,समाज बांधव व भगिनी या सर्वांनी सभेत उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन अध्यक्ष सुधाकर पेडणेकर यांनी केले आहे.

---

### ब्राह्मण प्रासादिक हौशी नाट्यमंडळ मोरजीतर्फे २१ रोजी नाट्यप्रयोग

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १८** : कट्टेवाडा मोरजी येथील श्री ब्राम्हण प्रासादिक हौशी नाट्यमंडळ, मार्फत २१ माझी विच्छा पुरी करा नाट्य प्रयोग देवी मोरजाईच्या शिशिरोत्सवा निमित्त शुक्रवार रात्री १०.०० वाजता श्री देवी मोरजाईच्या भव्य मंडपात आयोजित करण्यात आला आहे. लेखक - वसंत सबनीस, रंगभूषा - सोपटे नाटयभंडार, सहायक दिग्दर्शक - समीर आणि मुन्ना, संगीत - सुनील आगरवाडेकर, पार्श्वसंगीत - सौरभ कारखानीस, तबला - अजीत शेटगावकर, दिग्दर्शक आणि कोंकणी अनुसर्जन जयेश बागकर, नेपथ्य - सोपटे नाटयभंडार, चोनसाई, पार्से हे तांत्रिक बाजू सांभाळणार आहे. यात भाग घेणारे कलाकार. साची पुर्खे. सिद्धार्थ ग. शेट्ये, वामन शेटगावकर. साईराज शेट्ये, समीर भिशेट. देवजी फडते, यश शेटगावकर. सिद्धेश शेटगावकर, सार्थक भिशेट, सत्यम शेटगावकर, सिद्धार्थ सावंत, श्वेता शेटगावकर, यशवंतच. शेटगावकर असतील. व्यवस्थापक श्री ब्राम्हण प्रासादिक नाट्यमंडळ कट्टेवाडा यांचे आहे. सर्व नाटय रसिकांना नाटय प्रयोगास उपस्थित राहून नाटकाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

### विद्या प्रसारक संस्थेतर्फे सूर्यकांत पेडणेकर यांचा गौरव

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १८** : विद्या प्रसारक हायस्कूल मोरजी, विद्याप्रसारक समाज यांच्या मार्फत मोरजीतील सूर्यकांत पेडणेकर यांनी हायस्कूलसाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा खास गौरव आमदार जीत आरोलकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेचे चेअरमन गणेश शेटगावकर मुख्याध्यापक दिलीप मेथर प्रकाश शेटगावकर, अनंत शेटगावकर माजी सरपंच तथापंच सुरेखा शेटगावकर, माजी उपसरपंच अमित शेटगावकर, अनिल गाड, अनंत शेटगावकर दादी शेटगावकर शिक्षक आदी उपस्थित होते.

आमदार जीत आरोलकर यांच्या हस्ते सूर्यकांत पेडणेकर यांना स्मृतीचिन्ह देऊन त्याचा गौरव करण्यात आला. सुरुवातीला विद्या प्रसारक हायस्कूलचे मुख्याध्यापक दिलीप मेथर यांनी स्वागत आणि प्रास्ताविक करत असताना सूर्यकांत पेडणेकर यांनी हायस्कूलचे कोणतेही काम असेल, त्यावेळी ते शिक्षण विभागाकडे जाऊन पत्रव्यवहार त्या ठिकाणी पोहोचायचे. आणि शिक्षण संस्थेसाठी त्यांनी दिलेलं योगदान लक्षात घेऊन त्यांचा हा गौरव आयोजित केल्याचे ते म्हणाले.

आमदार जीत आरोलकर यांनी यावेळी बोलताना विद्या प्रसारक हायस्कूल वेगवेगळ्या माध्यमातून वेगवेगळ्या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास करण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्या हायस्कूलसाठी जर भविष्यात जागा उपलब्ध झाली. तर दर्जेदार क्रीडा मैदान सरकार मार्फत उपलब्ध करून देणार असल्याचे ते म्हणाले.

---

### उसप गावातील शिमगोत्सवाला, करवल्या उत्सवाला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १८** : उसप या गावातील शिमगोत्सवाला सुरुवात झाली असून हा शिमगोत्सव खूप पूर्वीपासून आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करतात. गावातील लहान बालकांना करवल्या म्हणून ठेवतात. त्यांची नाकं मोत्यांच्या टोकानी टोचून नाकात मोती घालतात व करवल्या वाजत गाजत रोमटामेळ चव्हाट्यावर येतात.

तेथे लहान मोठे मिळून विविध वेशभूषा परिधान करून रोमटमेळ खेळतात.त्यानंतर करवल्याची ओटी भरण्याचा कार्यक्रम साजरा करतात. नंतर करवल्या सह रोमटामेळ पुढील तीन दिवस प्रत्येक वाड्यावर घरोघरी जातात. सुवासिनीतर्फे करवल्यांची ओटी भरतात. तसेच घोडेमोडणी, मास्तो, शिमग्याचा मान थारावणे, नाटक व सातव्या दिवशी देवीचे न्हावण दिले जाते. नंतर देवीचा कळस घरोघरी फिरविला जातो. प्रत्येक घरात कळसाची लोक मनोभावे पूजा - अर्चा करतात. त्यानंतर कळस मंदिरात आणला जाती असा हा शिमगोत्सवाचा कार्यक्रम उसप गावचे गावकरी मोठ्या भक्ती भावाने साजरा करतात.

# न्यूझीलंडचा पाकिस्तानवर शानदार विजय

## टी -२० मालिकेत २-० अशी आघाडी : टिम सेफर्ट आणि फिन ऍलन जोडीची महत्त्वपूर्ण खेळी

**ड्युनेडिन, दि. १८ :**



न्यूझीलंडने पाकिस्तानविरुद्धच्या ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. दुसऱ्या सामन्यात संघाने पाकिस्तानचा ५ गडी राखून पराभव केला. मंगळवारी ड्युनेडिनमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात यजमान न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला.

किवींनी पाकिस्तानला १५ षटकांत ९ बाद १३५ धावांवर रोखले. त्यानंतर, १३.१ षटकांत, त्यांनी ५ गडी गमावून विजयासाठी आवश्यक धावा केल्या. पावसामुळे सामना १५-१५ षटकांचा करण्यात आला. न्यूझीलंडची टिम सेफर्टला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. सामना स्थानिक वेळेनुसार दुपारी २.१५ वाजता सुरू होणार होता, परंतु नाणेफेकीपूर्वी पाऊस पडला. अशा परिस्थितीत सामना दुपारी ३.३० नंतर सुरू झाला.

१३५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या सलामीवीरांनी जलद धावा केल्या. टिम सेफर्ट आणि फिन ऍलन यांच्या जोडीने २८ चेंडूत ६६ धावांची सलामी भागीदारी केली.

येथून, पुढील ३१ धावा काढताना संघाने ४ विकेट गमावल्या. सेफर्टने ४५ आणि अॅलनने ३८ धावा केल्या. मार्क चॅपमनने एक आणि डॅरिल मिशेलने १४ धावांचे योगदान दिले.

शेवटी, मिशेल हेने नाबाद २१ धावा करत संघाला विजयाकडे नेले. हरिस रौफने २ विकेट घेतल्या. नाणेफेक गमावून फलंदाजीला आल्यानंतर पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. संघाने पहिल्याच षटकात सलामीवीर हसन नवाजची विकेट गमावली. त्याला जेकब डफीच्या चेंडूवर मार्क चॅपमनने झेलबाद केले. संघाने ५२ धावा करत ४ विकेट गमावल्या.

कर्णधार आगा सलमान (४६ धावा) वगळता इतर कोणताही फलंदाज मोठी धावसंख्या उभारू शकला नाही. शादाब खानने २६ आणि शाहीन आफ्रिदीने नाबाद २२ धावा केल्या. न्यूझीलंडकडून जेकब डफी, बेन सायरस, जिमी नीशम आणि ईश सोधी यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या.

# मालविका बनसोडची बॅडमिंटनमध्ये उत्कृष्ट कामगिरी

**नवी दिल्ली, दि. १८ :**



भारताच्या अनेक बॅडमिंटनपटूंनी जागतिक बॅडमिंटन स्पर्धा आणि ऑलिम्पिकमध्ये आपल्या कामगिरीने सर्वांना प्रभावित केले आहे. भारताच्या पीव्ही सिंधू, सायना नेहवाल यांनी वयाची पंचविशी गाठण्यापूर्वीच ऑलिम्पिक पदकाला गवसणी घालत आपल्या कामगिरीची जगभरात छाप पाडली. पण महाराष्ट्रातील मराठमोळी मालविका बनसोड हिने बॅडमिंटनमधील आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. भारताची ही नवी बॅडमिंटन स्टार खेळाडू कोण आहे जाणून घेऊया.

गेल्या आठवड्यात, मालविकाने ऑल इंग्लंडमध्ये तिचा टॉप-१५ मधील दुसरा विजय नोंदवला. तिने यापूर्वी चीनमध्ये पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती ग्रेगोरिया मारिस्का तुनजुंगला पराभूत केले होते. २३ वर्षांची असलेली मालविका ही सायना नेहवाल आणि पीव्ही सिंधूसारखी फारशी सर्वांच्या परिचयाची नाही. पण बॅडमिंटनच्या कोर्टवरील तिची कामगिरी तितकीच उत्कृष्ट आहे. पण आपल्या उत्कृष्ट कामगिरीनंतरही प्रायोजकत्त्वासाठी मालविका झगडताना दिसत आहे.

मालविका ही मूळची नागपूरची. तिथेच तिने बॅडमिंटनची धुळाक्षरे गिरवली. बॅडमिंटन आवड असली तरी मालविकाने कॉम्प्युटर इंजीनियरिंगचं शिक्षण पूर्ण केलं आहे. बॅडमिंटन कोर्टवर तिचा प्रवेश तसा उशिराच झाला. कॉम्पुटर इंजिनीयर असलेल्या मालविकाच्या आजोबांना बॅडमिंटनचे प्रचंड वेड होते आणि त्यांच्या नातीने बॅडमिंटन कोर्टमधील आपली कामगिरी कायम चालू ठेवावी अशी त्यांची इच्छा होती.

मालविकाची आई ही दंतवैद्यक आहे, पण आपले क्लिनिक सांभाळून त्यांनी मालविकाला कसं डाएट लागेल याचा अभ्यास केला आणि त्यानुसार आखणी केली. मालविका नागपूरातील मध्यमवर्गीय कुटुंबातील असल्यामुळे तिच्या डाएटसाठी तज्ञ नेमणं हे त्यांना परवडण्यासारखं नव्हतं. मालविकाकडे सिंधूसारखे निसर्गदत्त उंचीचे वरदान नाही ना सायनासारखी ताकद पण तरीही मालविका पहिल्यांदा प्रसिद्धीझोतात आली जेव्हा तिने दुखापतग्रस्त असलेल्या सायना नेहवालचा इंडिया ओपन स्पर्धेत पराभव केला. परंतु तरीही तिला फंडिंग देण्याकरता कोणीही पुढे आले नाही. कारण तिने अद्याप पीव्ही सिंधूला पराभूत केलेलं नाही किंवा देशातली अव्वल बॅडमिंटनपटू झालेली नाही.

मालविका ही अत्यंत बुद्धिमान आहे आणि कोणच्याही सांगण्या, बोलण्याला बळी पडणारी ती नक्कीच नाही. ही मराठमोळी मुलगी गेल्या पाच वर्षांपासून न डगमगता आत्मविश्वासाने खेळताना दिसत आहे आणि तिने तिचे प्रशिक्षक आणि पालकांसह एक स्टार्टअप प्रमाणे सिस्टिम तयार केली आहे आणि यासह महाराष्ट्रातील वरिष्ठ प्रशिक्षकांकडून ती मार्गदर्शन घेत असते.



कुडचडे : स्व. भाऊसाहेब बांदोडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना पुणिमा केरकर. सोबत मोर्तू नाईक, अशोक नाईक, संतोष नाईक, बंटी उडेलकर, ज्ञानेश्वर नाईक, व मान्यवर.

# दयानंद कला केंद्रातर्फे भाऊसाहेब बांदोडकर जयंती साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**कुडचडे, दि. १८** : ग्रामीण लोक जीवन व लोक संस्कृतीचे प्रतिबिंब मांडावर होणाऱ्या लोक कलातून प्रदर्शित होते, असे प्रतिपादन गोव्यातील प्राख्यात लोक कला अभ्यासक व संशोधक पौणिमा केरकर हिने शिरफोड कुडचडें येथे दयानंद कला केंद्रतर्फे स्व. भाऊसाहेब बांदोडकर जयंतीदिनी आयोजित केलेल्या धालो - फुगडी कायशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मुखेल पाहुण्या नात्याने बोलताना केले. सुरवातीस स्व. भाऊसाहेबांच्या प्रतिमेला पाहुण्यांनी हार अर्पण करून आदरांजली दिली.

या कायक्रमास कला व संस्कृती खात्याचे निवृत्त संचालक एम. व्ही. नाईक, सल्लूयागार सदस्य राज्य पुरस्कार विजेते ज्ञानेश्वर नाईक, जन उत्कर्ष शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोक नाईक, ज्येष्ठ कलाकार आनंदी नाईक, अलंकार क्लब सावर्डेंचे प्रशांत नाईक, पर्यटन महामंडळाचे माजी सदस्य केशव नाईक, चंद्रशेखर नाईक, कुडचडे महिला मंडळ शाखा सचीव अनिता नाईक, समाज कार्यकर्ते मोहन गावस देसाई, मांड प्रमुख संतोष नाईक या प्रसंगी उपस्थीत होते. केंद्र सचिव बंटी उडेलकर यांनी पाहुण्यांचे तथा प्रशिक्षण वर्गांत सहभागी कुडचडें - शिरफोड परिसरांतील महीलांचे स्वागत व मांड कार्यशाळेची माहिती सांगितली.

अध्यक्ष मोर्तू नाईक यांनी शिरफोड-बागवाडा धालो मंडळाची थोडक्यांत माहिती करून युवतीनी धालो प्रशिक्षण घ्यावे जेणेकरून धालो नृत्य कलेचे जतन शक्य होईल. यावेळी कलाकार आणि कला संस्था साठी शासनातर्फे राबवण्यात येणारया योजनांची माहिती दिली. सौ. केरकर हिने प्रशिक्षणार्थ्यांना आपण लिहलेली धालो गीते गाऊन दाखविली आणि व्याख्यानांतून धालो मांडाचे सवरधन होणे अत्यंत गरजेचे असून अशा कार्यक्रमांत महिलांनी उपस्थित राहावे, कार्यक्रमांत भाग घ्यावा, असे आव्हानही केले.

कार्यक्रमांत सेल्फ हेल्प ग्रुप मेणकुरे-डिचोली रमीता राजेंद्र नाईक यांचा नेतृत्वाखाली शिरफोड-बागवाडा महालांनी प्रशिक्षणांत भाग घेतला. आनंदी नाईक हिने आभार प्रदर्शन केले तर सहाय्यक सदानंद खांडेकर, वनीता प्र. नाईक यांनी आयोजनांत मदत केली. कार्यशाळेत एकूण तिस महिला आणि बरींच ग्रामस्थ मंडळी उपस्थित होती.

# गोवा वेल्हा येथे महिलादिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड



गोवा वेल्हा : अमिता सलत्री समवेत प्रेरणा सेल्फ हेल्प ग्रुपच्या सर्व सदस्या.

**पणजी, दि. १८** : दिवसेंदिवस कोवळ्या वयाच्या वालिकांवरील, वयांत आलेल्या मुलींवरील अपंग, अंध आणि मतिमंद मुलींवरील तसेच एकूणच सर्व वयांच्या महिलांवरील अत्याचार भयानकरित्या वाढत चाललेले आहे. विनयभंग आणि लैंगिक छळवादाला कित्येक निरागस मुलींचा बळी जात आहे. अशावेळी प्रत्येक मुलीने महिलेने सावधगिरीने वावरले पाहिजे. अंगातील दुबळेपणा काढून अन्यायाविरुद्ध बंड पुकारले पाहिजे. तसेच सरकारी आणि बिनसरकारी महिला संघटनाच्या तसेच पोलिस खात्याच्या सहकार्याने अन्यायाविरुद्ध लढा देणे, काळाची होऊन बसली आहे. कुठल्याही परिस्थितीत हार मानू नका अन्यायाविरुद्ध पेटून उठा. त्याचबरोबर चरित्र्य संपन्नता हा जो महिलेचा खरा अलंकार आहे, तो सर्वांनी आयुष्यभर जपला पाहिजे, असे प्रतिपादन अभिनेत्री आणि समाज कार्यकर्त्या अमिता नायक सलत्री यांनी केले.

गोवा वेल्हा येथील प्रेरणा स्वयंसहाय्य गटातर्फे महिला दिनानिमित्त एका खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पॉप्यूलर विद्यालयाच्या चामुंडा हॉलमध्ये आयोजित झालेल्या. या कार्यक्रमान प्रमुख पाहुण्या म्हणून अमिता सलत्री उपस्थित होत्या. आपल्य भाषणात त्यांनी उपस्थित महिलांना वरील सल्ला दिला.

प्रारंबी प्रेरणा गटाच्या अध्यक्ष राधा काणे यांनी स्वागतपर भाषण केले. रीचा नायक यांनी सलत्री यांचा परिचय करून दिला. खजिनदार कुंदा नायक यांनी सलत्री यांना पुष्पगुच्छ प्रदान केला. सचिव प्रतिभा नायक यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी विविध करमणूकीचे कार्यक्रम आणि विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सर्व विजेत्यांना सलत्री यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला महिला उपस्थित होत्या.

# म्हापसा येथे सुका कचरा संकलन केंद्र, सर्कुलॅरिटी कनेक्टचे उद्घाटन

## मोंडेलेझ इंडियाचे उपक्रमास पाठबळ | जागतिक पुनर्वापर दिनानिमित्त उपक्रमाचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १८ :** जागतिक पुनर्वापर दिनानिमित्त म्हापसा येथे मोंडेलेझ इंडिया फूड्स प्रा. लि.टच्या सीएसआर उपक्रमाच्या माध्यमातून प्लास्टिक लाईटहाऊस प्रकल्पाअंतर्गत सुका कचरा संकलन केंद्रचे उद्घाटन करण्यात आले. अनुभूती वेल्फेअर फाउंडेशनद्वारे राबविण्यात येत असलेला प्लास्टिक लाईटहाऊस प्रकल्प हा शाश्वत विकास आणि सर्कुलर अर्थव्यवस्था यांना प्रोत्साहन देण्यासाठी पुनर्वापर आणि कचरा व्यवस्थापनाची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करतो.

उद्घाटन प्रसंगी म्हापसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार व गोवा विधानसभेचे सदस्य श्री. जोशुआ डिसूझा उपस्थित होते. त्यांनी घरोघरी कचरा वर्गीकरण करणे आणि पुनर्वापर वाढवणे या बाबींचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष महेश पाटील आणि म्हापसा नगरपरिषदेच्या अध्यक्षा प्रिया मिशाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

म्हापसा शहर स्वच्छ आणि शाश्वत शहर म्हणून घडवण्याबाबत आम्ही आखलेल्या धोरणाच्या दिशेने आज एक महत्त्वाचे पाऊल सुका कचरा संकलन केंद्राचे उद्घाटनाच्या माध्यमातून उचचले जात आहे. सरकारी संस्था, महामंडळे, संघटना आणि नागरिक एकत्रितपणे जबाबदारीच्या भावनेने एकत्र आल्यास आपण काय साध्य करू शकतो हे या उपक्रमातून अधोरेखित होते. ही केवळ पायाभूत सुविधा नाही, तर भावी पिढ्यांसाठी निरोगी पर्यावरण उपलब्ध करण्याच्या दिशेने एक चळवळ आहे.





म्हापसा : मार्केट परिसरामध्ये सुका कचरा संकलन केंद्राचे उद्घाटन करताना गोवा विधानसभेचे सदस्य ज्योशुआ डिसूझा, म्हापसा नगरपरिषदेच्या अध्यक्षा प्रिया मिसाळ समवेत मान्यवर.

जागतिक पुनर्वापर दिनानिमित्त, डीडब्ल्यूसीसी (मोंडेलेझ इंडियाच्या सहकार्याने) उपक्रमाचा प्रारंभ हा जागतिक पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी पुनर्वापराचे महत्त्व अधोरेखित करतो. म्हापसा मार्केटजवळ स्थित, डीडब्ल्यूसीसी (मोंडेलेझ इंडियाच्या सहकार्याने) प्रकल्पाद्वारे कचरा वर्गीकरण, पुनर्वापर आणि प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा प्रदान करेल, ज्यामुळे म्हापसा शहर हे स्वच्छ, हरित शहर बनविण्याचे ध्येय साध्य होईल.

मोंडेलेझ इंडियाच्या सहकार्याने सुरू झालेल्या या सुका कचरा संकलन केंद्राचे उद्घाटन ही बाब केवळ एका सुविधेच्या उद्घाटनापुरती मर्यादित नाही, तर ही एक नवी सुरवात आहे, स्वच्छ, हरित म्हापसा शहराच्या निर्मितीसाठीच्या सामूहिक प्रवासाची ही सुरुवात आहे. समाजाची ताकद, सहकार्य आणि जबाबदार कचरा व्यवस्थापनासाठी वचनबद्धतेस हा उपक्रम प्रतिबिंबित करतो. एकत्रितपणे, आपण एक शाश्वत भविष्य घडवत आहोत.

उद्घाटनानंतर, कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर क्षेत्रातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सर्कुलॅरिटी कनेक्ट २०२५ या परिषदेचे आयोजन करण्यात आले. अनुभूती वेल्फेअर फाउंडेशनने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाने पुनर्वापर क्षेत्रातील धोरणकर्ते, व्यावसायिक, शासकीय प्रतिनिधी, भंगार विक्रेते आदी घटकांना या क्षेत्रातील अनुपालन प्रक्रियेतील अडथळे, बाजारपेठेतील मागणीतील बदल आणि किमतींतील चढउतार यासारख्या प्रमुख मुद्द्यांवर सहयोग करण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी एक व्यासपीठ लाभले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १९६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 196 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .